## रंग वारीचे...

कर कटावरी तुळसीच्या माळा । ऐसें रूप डोळां दावीं हरी ॥१॥
ठेविले चरण दोन्ही विटेवरी । ऐसें रूप हरी दावीं डोळां ॥ध्रु.॥
कटीं पीतांबर कास मिरवली । दाखवीं वहिली ऐसी मूर्ती ॥२॥
गरुडपारावरी उभा राहिलासी । आठवें मानसीं तें चि रूप ॥३॥
झुरोनी पांजरा होऊं पाहें आतां । येईं पंढरीनाथा भेटावया ॥४॥
तुका म्हणे माझी पुरवावी आस । विनंती उदास करूं नये ॥५॥




# ॥ ज्योतिर्मय ॥

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक १२६ वा ❑ शनिवार दि.२८ जून २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# शक्तिपीठ महामार्गाला विरोध का?

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्ग हा महाराष्ट्रातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून, राज्य शासनाने त्याच्या आराखड्यास नुकतीच मंजुरी दिली आहे. हा सहापदरी महामार्ग १२ जिल्ह्यांतून आणि गोवा राज्यातून जाणार असून, तीन शक्तिपीठे, दोन ज्योतिर्लिंगे आणि इतर अनेक धार्मिक स्थळांना जोडणारा आहे; मात्र, काही महत्त्वाच्या धार्मिक स्थळांचा समावेश न केल्याने आणि भूसंपादनामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार असल्याने याला तीव्र विरोध होत आहे. तरीही, राज्य सरकार हा महामार्ग मार्गी लावण्यास ठाम आहे.

समृध्दी मार्गाला जसा विरोध राज्यातील शेतकऱ्यांनी व पर्यावरण तज्ञांनी केला तसाच विरोध आता देखील होत आहे.शक्तिपीठ मार्ग पूर्णतः जंगलातून,शेती क्षेत्रातून जात असल्याने येथील वनसंपदेचा ऱ्हास मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे या महामार्गाला विरोध आहे . त्याच बरोबर ज्या उद्देशाने हा मार्ग जोडला जात आहे.त्या उद्देशापासून सरकार दूर जात आहे.

नागपूर-गोवा शक्तिपीठ महामार्गाच्या आराखड्यास राज्य शासनाने नुकतीच मंजुरी दिली आहे. हा शक्तिपीठ महामार्ग सहापदरी असेल. त्यावर ४७ मोठे पूल, ३० बोगदे, ८ रेल्वे क्रॉसिंग आणि २६ ठिकाणी इंटरचेंजेस आहेत. राज्यातील वर्धा, यवतमाळ, हिंगोली, नांदेड, परभणी, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग या १२ जिल्ह्यांतून आणि गोवा राज्यातही जाणारा ; कोल्हापूर येथील महालक्ष्मी देवी, तुळजापूरची तुळजाभवानी, नांदेडमधील माहूरची रेणुकामाता ही तीन शक्तिपीठे जोडणारा तसेच औंढा नागनाथ, परळी वैजनाथ ही २ ज्योतिर्लिंगे इतकंच नाही, तर पंढरपूरचे श्री विठ्ठल-रुक्मिणी, नांदेड येथील गुरू गोविंदसिंग महाराज यांचा गुरुद्वारा यासह अनेक प्रसिद्ध धार्मिक स्थळांना जोडणारा बहुचर्चित शक्तिपीठ महामार्ग व्हायलाच हवा. त्यात इतर धार्मिक स्थळांनाही सोबत का घेतले जात नाही? हा ही प्रश्न उपस्थित होत आहे.

महाराष्ट्रात धार्मिक दृष्टीने पवित्र समजली जाणारी अनेक गावे आणि त्या गावांतील विशिष्ट स्थाने आहेत. ही सगळी महामार्गाने जोडता आली असती मात्र शेगाव ,आळंदी

शक्तिपीठ महामार्गात समाविष्ट नाही.काही राजकीय नेत्यांचा विरोध झाल्याने हा भाग शक्तिपीठाला जोडण्यात आला नाही.त्यामुळे वारकरी संप्रदाय देखील या मार्गाला विरोध करत आहे.

महामार्गाला राज्यातील बाराही जिल्ह्यांतून मोठा विरोध होत आहे. बीड जिल्ह्यात विरोध होताना दिसून येत आहे. बीडच्या अंबाजोगाई आणि परळी तालुक्यातून शक्तिपीठ महामार्ग जाणार असून या ठिकाणचे शेतकरी या महामार्गाविरोधात आक्रमक झालेले दिसून आले आहेत.मात्र, केवळ कोल्हापूर जिल्ह्याचा विरोध आहे असे सांगून सरकार या मार्गासाठी जमीन अधिग्रहणाच्या तयारीत आहे. विशेष म्हणजे जेथून महामार्ग जात नाही त्या सांगली आणि कोल्हापुरातील लोकप्रतिनिधींचा पाठिंबा मिळवून हा महामार्ग रेटला जात आहे.या मार्गावरील शेत जमिनीचे भाव जास्त असताना सरकार कमी किंमतीत शेतकऱ्यांची जमीन घेत असल्याने शेतकऱ्यांचा या मार्गाला विरोध होत आहे.जमिनींचे दर ४० ते ४५ लाख रुपये आहेत. याचा अर्थ ४५ लाखाची जमीन सरकार १६ लाखात घेणार आहेत.

राज्यात पुन्हा एकदा मोठ्या मताधिक्याने महायुती सरकार सत्तेत आलं आहे. अशातच राज्य सरकारचा अतिशय महत्वकांक्षी प्रकल्प असलेल्या शक्तिपीठ महामार्ग हा कोणत्याही परिस्थितीत करायचा असा निर्धार सरकारकडून व्यक्त केला जात आहे. असे असलं तरी नागपूर ते गोवा जाणाऱ्या या महामार्गाला आता राज्यभरातील अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून विरोध होताना दिसत आहे. या विकासकामाच्या विरोधात शेतकरी सुद्धा आक्रमक झाला आहे. दरम्यान कोल्हापूरमध्ये सुद्धा अत्यंत आक्रमक पद्धतीने शक्तीपीठला विरोध होत आहे.अशातच आता या विरोधाची धग बीड जिल्ह्या सह इतर संबंधित जिल्ह्यात पर्यंत पोहचली आहे.

# सेवाभाव हा भक्तिभावाइतकाच महत्त्वाचा! - ॲड. सतिश गोरडे

## आरोग्यवारी वैद्यकीय सेवाकार्याचा शुभारंभ

ज्योतिर्मय साहित्य

**पिंपरी** – सेवाभाव हा भक्तिभावाइतकाच महत्त्वाचा असतो म्हणून विश्व हिंदू परिषदेच्या वतीने आषाढी वारीनिमित्त आरोग्यवारी वैद्यकीय सेवाकार्याचा शुभारंभ करण्यात आला आहे! अशी माहिती विश्व हिंदू परिषद पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहमंत्री आणि सेवा आयाम पालक ॲड. सतिश गोरडे यांनी महासाधू मोरया गोसावी मंदिराचे प्रांगण, चिंचवडगाव येथे दिली. रावेत येथील इस्कॉन श्री गोविंद धामचे अध्यक्ष जगदीश गौरांग प्रभू, ज्येष्ठ उद्योजक नितीन अग्रवाल, ज्येष्ठ कीर्तनकार आणि वीणेकरी ह.भ.प. मधुकर महाराज मोरे, सामाजिक कार्यकर्ते मधुकर बच्चे, ॲड. ललित झुनझुनवाला, माजी प्रांत मंत्री विजय देशपांडे आदी मान्यवरांची याप्रसंगी प्रमुख उपस्थिती होती.

ॲड. सतिश गोरडे पुढे म्हणाले की, विश्व हिंदू परिषदेच्या वतीने गेली ३८ वर्षे देहू - आळंदी व त्र्यंबकेश्वर ते पंढरपूर या मार्गावर संतश्रेष्ठ ज्ञानेश्वरमाउली आणि जगद्गुरू तुकाराममहाराज व संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळ्यात वारकरी



बंधू - भगिनींसाठी अखंड वैद्यकीय तथा आरोग्यसेवा देण्यात येते. या आरोग्यपथकात यंदा ६ रुग्णवाहिका, १३ डॉक्टर्स, २० परिचारिका आणि अन्य सेवाभावी कार्यकर्ते असा ५० व्यक्तींचा ताफा आहे. त्यांच्यासोबत उत्तम दर्जाची औषधे असून वारीचे संपूर्ण १८ दिवस हा ताफा दिवसरात्र आरोग्य सेवाकार्यासाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यावर्षी प्लास्टिकमुक्त अन् पर्यावरणपूरक वारीचा संकल्प सोडण्यात आला आहे. आरोग्य उत्तम असेल तरच वारकरी आनंदाने आपली वारी पूर्ण करतील, हे विश्वची माझे घर असे माऊली म्हणतात म्हणून पृथ्वी वरील सर्वांचे आरोग्य चांगले रहावे. पंढरीचा वारकरी, वारी चुको नेदी हरी या अभंगोक्ती प्रमाणे आमची सुद्धा आरोग्य वारी चुकवू देऊ नको अशी पांडुरंगाला विनंती

विश्व हिंदू परिषदेचे भूमिका आहे ! जगदीश गौरांग प्रभू यांनी, जो भक्तांची सेवा करतो तोच माझा खरा भक्त असतो, असे भगवंत म्हणतो ! असे विचार मांडले. नितीन अग्रवाल यांनी, वैद्यकीय सेवेत सहभागी व्हावे असे मनात होते म्हणून एका रुग्णवाहिकेचा पूर्ण खर्च करण्याची इच्छा व्यक्त केली आणि त्याला परिषदेने मान्यता दिल्याने खूप समाधान वाटते आहे यावर्षी स्व. जयप्रकाश व स्व. कुसुम अग्रवाल यांचे स्मरणार्थ मोफत आरोग्यसेवा उपक्रम चालू करण्यात येत आहे ! अशी भावना व्यक्त केली.

याप्रसंगी संत तुकाराम महाराज सेवाभावी संस्थान, परभणी या वारकरी पथकाला प्रातिनिधिक स्वरूपात औषधांचा खोका मान्यवरांच्या हस्ते सुपुर्द करण्यात आला; तसेच रुग्णवाहिकांचे पूजन करण्यात आले. डॉ. शर्वरी यरगट्टीकर यांनी प्रास्ताविकातून, अध्यात्म, वारी आणि सेवाभाव या गोष्टी शाश्वत राहतील ! अशी भावना व्यक्त केली. दीपप्रज्वलन आणि विठ्ठल - रखुमाई यांच्या प्रतिमांचे पूजन करून कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. विश्व हिंदू परिषद पिंपरी - चिंचवड जिल्हा महिला कार्यकर्त्यांनी भक्तिरचनांचे सादरीकरण केले. संयोजन पी एन पुजारी, विजय देशपांडे, यशवंत देशपांडे, गोडबोले काका, अशोक यलमार यांनी केले. विश्व हिंदू परिषद पिंपरी - चिंचवड जिल्हामंत्री धनंजय गावडे यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

# संत तुकाराम महाराज पालखीचे काटेवाडीत पारंपरिक स्वागत

ज्योतिर्मय साहित्य

**बारामती** – बारामतीतील काटेवाडी येथे संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे ग्रामस्थांनी पारंपरिक पद्धतीने धोतराच्या पायघड्या घालून, सनई-चौघड्यांच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात स्वागत केले. गेल्या १४० वर्षांपासून काटेवाडीत धोतराच्या पायघड्यांनी पालखी स्वागताची परंपरा जपली जात आहे. यंदाही रांगोळ्या, पताका आणि स्वागत कमानींनी परिसरातील वातावरण भक्तिमय झाले.

काटेवाडीत संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे स्वागत धोतराच्या पायघड्यांनी करण्याची परंपरा वर्षानुवर्षे जपली जात आहे. संत गाडगे महाराजांच्या शिकवणुकीतून ही प्रथा सुरू झाल्याचे सांगितले जाते. गावाच्या वेशीजवळ पालखी खांद्यावर घेतल्यानंतर ग्रामस्थ पायघड्या घालतात. या वेळी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. वारकऱ्यांनी गावातील जेवणासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या घरीही जेवणाचा आस्वाद घेतला.

बारामतीत पालखी सोहळा दाखल झाल्यानंतर मेंढ्यांच्या गोल रिंगणाचे आकर्षण असते. काटेवाडीतील बस स्थानकाजवळ पालखीचे स्वागत झाल्यानंतर मुख्य मार्गावरून पालखी गावातील मैदानावर नेण्यात आली. या वेळी पालखीभोवती मेंढ्यांचे रिंगण घातले गेले. रिंगणानंतर पालखीने इंदापूर तालुक्यातील सणसर येथे प्रस्थान ठेवले.

इंदापूर तालुक्याचे प्रवेशद्वार असलेल्या भवानीनगरमधील छत्रपती सहकारी साखर कारखाना येथे इंदापूर तालुक्याचे लोकप्रतिनिधी व क्रीडा आणि युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, कारखान्याचे अध्यक्ष पृथ्वीराज जाचक, त्याचप्रमाणे



इंदापूर तालुका प्रशासनाच्या वतीने सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. भाविकांनी दर्शनासाठी मोठ्या रांगा लावल्या. त्यानंतर पालखी सोहळ्याने सणसर मुक्कामी प्रस्थान ठेवले. या वेळी पालखी रथाचे सारथ्य दत्तात्रय भरणे यांनी केले.

# ‘संवादवारी’च्या प्रदर्शनाला सणसर येथे वारकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – डोक्यावर विठ्ठल-रुखमाईची मूर्ती, तुळशी वृंदावन, हातात टाळ, वीणा, भागवत धर्माचा पताका हाती घेत पांडुरंगाच्या दर्शनाच्या ओढीने पंढरपूरकडे मार्गस्थ वारकऱ्यांची पाऊले माहिती व जनसंपर्क महासंचालनालयच्या ‘संवादवारी’कडेही वळत आहेत. जगद्गुरु श्री संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यासोबत आयोजित ‘संवादवारी’ उपक्रमाअंतर्गत प्रदर्शन, चित्ररथ, एलईडी व्हॅन , कलापथक, पथनाट्याच्या माध्यमातून शासकीय योजनांचा जागर सुरू आहे. यापूर्वी कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, यवत, वरवंड, उंडवडी गवळ्याची, बारामती आणि सणसर येथे या उपक्रमाला वारकरी व ग्रामस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

पालखी सोहळ्यासोबत असलेला चित्ररथही वारकऱ्यांसाठी विशेष आकर्षण आहे. अनेक ठिकाणी वारकरी चित्ररथासोबत छायाचित्र घेताना दिसत आहेत. चित्ररथावर दर्शनी भागावरील लामणदिवा, तुळशी वृंदावनाची प्रतिमा असल्याने वारीसोबत असलेल्या भाविकांची पावले चित्ररथाकडे वळतात. चित्ररथरथाची रचना आणि त्यावर कलात्मकतेने दिलेली माहिती वारकरी बांधव कुतूहलाने पाहत आहेत. कलापथकाच्या सादरीकरणाला टाळ्या मिळत असून योजनांची माहिती व मनोरंजन अशी सांगड घातली जात आहे.

वारीसोबत चालणाऱ्या एलईडी व्हॅनवरील मोठ्या पडद्यावर दृकश्राव्य चित्रफीतीच्या माध्यमातून




योजनांची माहिती दिली जात आहे. लोककला पथकाच्या माध्यमातून ठिकठिकाणी भजन, विठुनामाच्या गजरासोबत रंजक पद्धतीने शासकीय योजनांची माहिती दिली जाते आणि त्यासोबत स्वच्छता आणि आरोग्याचे संदेशही देण्यात येतात. त्यामुळे या पथकासभोवतीही गर्दी दिसून येत आहे. वारकरी आणि नागरिक प्रदर्शनाला आवर्जुन भेट देत असून योजनांची माहिती जाणून घेत आहेत. प्रदर्शनाची मांडणी आणि मिळणाऱ्या नवीन माहितीमुळे प्रदर्शनाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

प्रदर्शनास भेट देणाऱ्या वारकऱ्यांना योजनांची माहिती देणारे पत्रके वितरण करण्यात येत आहेत. इंदापूर तालुक्यात २८ जून रोजी निमगाव केतकी आणि २९ जून रोजी इंदापूर पालखी तळ येथे प्रदर्शन आयोजित करण्यात येणार असून या प्रदर्शनाचा अधिकाधिक नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे. प्रदर्शनात ३० फ्लेक्स पॅनेलचा समावेश आहे. पशुसंवर्धन विषयक किसान क्रेडिट कार्डची सुविधा पशुपालकांना देणे, पशुधन अभियानांतर्गत उद्योजकता विकासाला चालना, बळीराजा शेतकऱ्याच्या उन्नतीसाठीच्या योजना व घेतलेले निर्णय, नागरिकांना भेसळविरहित अन्नधान्य मिळावे यासाठी सुरक्षित अन्न तपासणीच्या सुविधा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, कृषी योजनांच्या लाभासाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी, ‘महाविस्तार- एआय’ ॲप, सायबर सुरक्षितता, जलसिंचनासाठीचे प्रकल्प, सामाजिक न्यायासाठी मंत्रालयात ज्येष्ठ नागरिक कक्ष स्थापना, तृतीयपंथीयांच्या हक्कांचे संरक्षण आणि कल्याणकारी मंडळाची पुनर्रचना, आदिवासींच्या उत्थानासाठी महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोगाची स्थापना, प्रधानमंत्री आवास योजना टप्पा २ अंतर्गत ३० लाख घरे मंजूर, पीएम- जनमन, रमाई, शबरी, अटल बांधकाम कामगार वसाहत, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, मोदी आवास योजना आदी योजनांची माहिती देण्यात आली आहे.

याशिवाय पशुसंवर्धन अंतर्गत मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजना, राज्य स्तरावर कॉल सेंटरची स्थापना, पशु आरोग्य सेवांसाठी टोल फ्री क्रमांक, सहकार विभागांतर्गत आपले सहकार पोर्टलवर सहकार विभागाच्या ऑनलाईन सेवा उपलब्ध, परिवहन विभागांतर्गत महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण २०२५, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर वसतिगृह योजना, गोवारी बांधवांच्या विकासासाठी स्वतंत्र योजना, दिव्यांगणसाठी स्वतंत्र विभाग, उच्च व तंत्र शिक्षण अंतर्गत राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० ची अंमलबजावणी आदी माहिती या प्रदर्शनात फ्लेक्स पॅनेलवर प्रदर्शित करण्यात आली आहे.




# जात्यावरच्या ओव्या......

सावली पाहून
मी बी टेकवते वझं
पाठच बाळ माझं
आंबा मोठा डौलेबाज ||१४४||

इवाही करते
माझ्यागं तोड्याचा
सोयरा सजन मोठा
ईटाच्या वाड्याचा ||१४५||


संदर्भ - शांताई इंगळे
संकलन - सौ. मनोरमा बोराडे
सहशिक्षिका, छत्रपती संभाजीनगर

# संगीतकार मदन मोहन आणि लतादीदी





ज्योतिर्मय साहित्य

वो कौन थी मधील लग जा गले के फिर ये हसीं रात ... आणि नैना बरसे रिमझिम रिमझिम... या गाण्यांनी तर लोकप्रियतेचा कळस गाठला. गाण्यांसाठी रसिकांनी चित्रपट डोक्यावर घेतला. दीदींचा गोड कोवळा आवाज एखाद्या प्रेमिकेला साजेसा होता. काही रसिक तर गमतीने असं म्हणू लागले की पडद्यावरील भुतांना सुद्धा लताचाच आवाज चालतो. दुसरा आवाज त्यांना सुटच होत नाही. या अप्रतिम गीतांबद्दल मदन मोहन यांना फिल्मफेअर वा अन्य पुरस्कार मिळणे अपेक्षितच होते. पण दुर्दैवाने तो मिळाला नाही. मदन मोहन हे अत्यंत स्वाभिमानी होते. कोणापुढे पुरस्कारासाठी झुकणे वा लाचार होणे हे त्यांच्या स्वभावातच नव्हते. ते आपल्या पुढील कामात गढून गेले. लतादीदींनी त्यांना फोन केला आणि म्हणाल्या, मदन भैय्या, वो कौन थी ची गाणी इतकी सुंदर झाली की तुम्हाला पुरस्कार मिळेलच असे मला वाटले होते. त्यावर मदन मोहन उत्तरले, माझ्या दीदीला असं वाटलं ना की मला पुरस्कार मिळायला हवा होता, मग मला मिळाला. अन्य पुरस्काराची जरूर नाही.



रेडिओ लखनौवर काम करताना मदन मोहन यांचा संबंध बरकत अली आणि बेगम अख्तर यांसारख्या गायकांशी आला होता. त्यांच्या शैलीचा प्रभाव मदन मोहन यांच्यावर होताच. मैने रंग दी आज चुनरिया , जिया ले गयो जी मोरा सांवरिया , नैनों मी बदरा छाये या सारख्या गाण्यांवर बरकत अलींचा प्रभाव दिसून येतो. तर उनको ये शिकायत हैं , आज सोचा तो आंसू भर आये , आपकी नजरोने समझा , हैं इसीमे प्यार की आबरू , हम प्यार में जलने वालों को.. या गाण्यांवर बेगम अख्तर यांच्या गायकीचा प्रभाव दिसून येतो असं म्हटलं जातं. त्यांच्या भाई भाई या चित्रपटातील कदर जाने ना... या गीताने तर बेगम अख्तर इतक्या प्रभावित झाल्या की त्यांनी दूरध्वनी ( तेव्हा ट्रंककॉल ) करून मदन मोहन यांचे अभिनंदन केले.

लतादीदी आणि मदन मोहन यांचे भावाबहिणीचे नाते मदन मोहन यांच्या मृत्यूनंतरही कायम राहिले. वीर झारा हा यश चोपडांचा चित्रपट २००४ मध्ये आला. मदन मोहन यांचे निधन १४ जुलै १९७५ ला झाले. वीर झारा चित्रपटात एकूण अकरा गाणी आहेत. त्यातील आठ गाण्यांना लतादीदींचा आवाज आहे. या गाण्यांना संगीत आहे मदन मोहन यांचे ! आश्चर्य वाटलं ना... ! तुम्ही म्हणाल की हे कसं शक्य आहे ? मदन मोहन गेल्यानंतर चक्क तीस वर्षांनी त्यांचं संगीत ? होय, पण हे खरं आहे. मदन मोहन यांनी त्यांना सुचलेल्या शेकडो धून टेपरेकॉर्डवर रेकॉर्ड करून ठेवल्या होत्या. त्यांचा मुलगा संजीव कोहली याची इच्छा होती की आपल्या वडिलांनी अशा एखाद्या चित्रपटाला संगीत द्यावे की ज्यात सुपरस्टार अमिताभ बच्चन आणि हेमा मालिनी हे महान कलाकार असतील. पण मदन मोहन असताना त्याची ही इच्छा काही पूर्ण होऊ शकली नाही. यश चोपडा जेव्हा नवीन चित्रपट निर्मिती करत आहेत हे त्याला समजले, तेव्हा तो आपल्या पित्याच्या रेकॉर्ड केलेल्या काही धून, रचना घेऊन त्यांच्याकडे गेला. त्यांना त्या ऐकवल्या. त्यांनाही त्या पसंत पडल्या. त्यातील काही रचनांचा वापर त्यांनी या चित्रपटात केला. या चित्रपटातील गाण्यांसाठी मदन मोहन यांना मरणोत्तर फिल्मफेअर पुरस्कार मिळाला. मदनभैय्याना पुरस्कार मिळावा अशी दिदींची इच्छा होती. ती अशा प्रकारे पूर्ण झाली. या चित्रपटात दीदींच्या आवाजातील गाणी अशी आहेत तेरे लिये.., दो पल .., तेरे कुर्बान जावा , तुम पास आ रहे हो.., ऐसा देस हैं मेरा.., हम तो भाई जैसे है.., जाने क्यों .., ये हम आ गये .. **(क्रमशः)**




## दासबोध स्तवन

उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


# दास्यभक्ति

ज्योतिर्मय साहित्य

व्यवहार चातुर्य व वागण्या बोलण्याचं चातुर्य हवे असेल तर भगवान श्रीकृष्ण चं नाव प्रथम येत. अलौकिक अद्वितीय संपूर्ण समासाचा मला समजलेला अर्थ थोडक्यात सांगण्याचा प्रयत्न करते.

समर्थानी एकुण अठ्ठावीस ओव्यात हा समास सांगितला आहे. देवाचे दास होण्यासाठी सतत त्याच्या जवळ असले पाहिजे. त्याची पूजा अर्चा, होम हवन, आरती, नैवेद्य करणे पडेल ते सर्व काम ईश्वराची सेवा म्हणून पवित्र, निर्मळ भावनेने केली पाहिजे. त्यासाठी मन विकार विरहीत असले पाहिजे. म्हणजे लाडू पेढे मिळे पर्यन्त देवाची भक्ति एकदा ती पदरात पडले की देवाला विसरणे. अशी भक्ति असु नये. देवाचे वैभव कसे वाढेल या विषयी विचार व्हायला हवा. देवालये बांधावीत,जुन्या देवालयांचे पुनर्वसन करावे. जीर्णोद्धार करावा. देवाची पालखी छबिना, रथ, घोडे, पालख्या, सिंहासन, चौरंग, मेघडंबरी, छत्र, चामरे, अब्दागिरी, सोन्याच्या वस्तु, आसने, यांची नव निर्मिती करून जतन व संवर्धन करावे. देवाच्या नैवेद्य साठी मिळालेल्या जमिनी, फळबागा, अंबराय, अनेक प्रकारचे तबेले, फुलबागा या सर्वाचे जतन व संवर्धन करावे. स्वयंपाकाचीसाधने,कोठ्या कचेरी स्वयंपाक कोठारे, पांतस्थासाठी बांधलेली विश्राम घरे, पुष्करण्या (देवांची स्नानाची जागा) अद्ययावत ठेवावीत. देवाचे वैभव शब्दांनी सांगावे. ते एवढे आहे की दास्यभक्ति ही निरंतर असावी. त्यात कंजूसपणा करू नये. **(क्रमशः)**

# अभिमान न धरता कर्तव्यकर्म करावे



## श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

'मला कळत नाही' असे वाटणे ही परमार्थाची पहिली पायरी आहे. आपण अभिमानाने, 'मला सर्व समजते' असे मानून जगात वावरत असतो. खरोखर, अभिमानासारखा परमार्थाचा दुसरा मोठा शत्रू नाही. अभिमान हा हरळीसारखा नाश करणारा आहे असे म्हणणेसुद्धा थोडे अपुरेच पडेल; कारण हरळी वाढली तर ती दिसते, आणि म्हणून ती उपटून तरी टाकता येते; तशी अभिमानाची गोष्ट नाही. तो दिसत नाही आणि म्हणून तो केव्हा आणि कसा डोके वर काढील याचा पत्ताच लागणार नाही. चित्तशुद्धीच्या मार्गात मोठी धोंड कोणती असेल तर ती अभिमानाची आहे; आणि स्वत:च्या कर्तबगारीने आपण त्याच्या तावडीतून सुटू असे म्हणणेही वेडेपणाचे होईल. त्याच्या कचट्यातून सुटण्याचा मार्ग म्हणजे सद्गुरूला अनन्यभावे शरण जाऊन, अभिमानाच्या तावडीतून सोडविण्याबद्दल त्याची सतत प्रार्थना करणे हाच होय.

चित्तशुद्धी झाली की शेताची मशागत पुरी झाली असे म्हणायला हरकत नाही. पुढे प्रश्न, बी उत्तम असणे जरूर आहे. उत्तम बी कोणते हे कदाचित् आपल्याला समजणार नाही परंतु फळ चांगले कोणते हे सहज समजते. आता असे समजा, जी फळे गोड लागली त्यांचीच लागवड केली. तरी पण पुढे असे अनुभवाला येते की, काही काळ लोटल्यानंतर कालमर्यादेप्रमाणे ते झाड मरते आणि अर्थात् फळे मिळायची बंद होतात, आणि त्यामुळे मन कष्टी होते. यावरून असे दिसते की, आता गोड लागलेली फळे ही कालांतराने दु:खालाच कारणीभूत होतात. तर मग बी निवडताना असे पाहणे जरूर आहे की, ज्याची झाडे कायम टिकणारी आहेत आणि फळे अक्षय सुखाचा लाभ देणारी आहेत. जगात उत्पन्न झालेली अशी कोणती वस्तू आहे, की जी अक्षय टिकेल ? 'कोणतीही नाही' असेच उत्तर येईल. म्हणून विनाशी फळाच्या आशेने केलेले कोणतेही कार्य सुखाला नेत नाही, असे म्हणावे लागते. याकरिताच, भगवंताशिवाय दुसऱ्या कोणत्याही फळाची आशा न ठेवता कर्तव्यकर्म करीत राहणे, हाच सुखाचा मार्ग आहे, आणि हीच उत्तम बीजाची पेरणी आहे. भगवंताची मनोभावे प्रार्थना करावी की, 'हे देवा, तुझी भक्ती तुझ्याशिवाय इतर कोणत्याही फळाच्या आशेने न होईल अशी कृपा कर.' त्या दृष्टीने आपणही प्रयत्न करणे जरूर आहे. ज्याप्रमाणे किडके आणि चांगले एकत्र झालेले धान्य आपण सुपात घालून पाखडतो आणि किडके धान्य बाहेर उडवून लावून, मागे उत्तम धान्य शिल्लक ठेवतो त्याप्रमाणे भगवंताची भक्ती करता करता, भगवत्प्राप्तीशिवाय इतर होणाऱ्या इच्छा काढून टाकण्याचा क्रम ठेवावा म्हणजे कालांतराने भगवंताकरिताच भगवत्प्राप्ती अशी भावना दृढ होत जाईल.

खरे सुख हे कायम टिकणारे पाहिजे.

# ॥ संत महात्म्य ॥

लेखक - मधुकर बोरीकर
9403061886

## संत जनाबाई यांचा अभंग

ज्योतिर्मय साहित्य

माझे मनी जे जे होते ते ते दिधले अनंते
देह नेऊनी विदेही केले शांती देऊनी मी पण नेले
मूळ नेले हे क्रोधाचे ठाणे केले विवेकाचे
निज पदी दिघला ठाव जनी म्हणे दाता देव

संतश्रेष्ठ जनाबाई यांचा हा एक ,वर वर पाहता, अत्यंत सोपा वाटणारा पण ती स्थिती गाठायची म्हटल्यास अत्यंत कठीण असा हा अभंग आहे. जसा एखादा कुशल स्वयंपाकी एखादा पदार्थ बनवताना आपणास तो सहजगत्या बनवला आहे आणि आपल्यालाही तो बनवता येईल असे त्याच्या कृतीकडे पाहून वाटते, पण प्रत्यक्षात आपण जेव्हा या गोष्टी करू लागतो तेव्हा त्या प्रक्रियेतील जटिलता आपणास लक्षात येते. आणि त्या व्यक्तीच्या कौशल्याचे महत्त्व कळते. अगदी त्याच पद्धतीने जनाबाईंनी सोप्या शब्दात सांगितलेली आणि सिद्ध केलेली ही कृती प्रत्यक्षात किती कठीण आहे हे आपल्याला दिसून येईल.

पौर्णिमेच्या रात्री आकाशात चंद्र दिसतो. आकाराने तो इतका मोठा दिसतो की जणू आपण उंच डोंगरावरून जर उडी मारली तरी सुद्धा हाताला लागेल की काय? असे वाटते, पण तोच चंद्र प्रत्यक्षात किती दूर आहे हे जसे कळते, तसेच या महान संतान ची साधना आणि मग सिद्धत्व या दोन्ही बाबींची कल्पना आपणास येईल. आता आपण या दिव्य अभंगाची अमृतकरण सेवन करण्याचा प्रयत्न करूयात.

माझे मनी जेजे होते तेथे दिधले अनंते

आपल्या मनात या प्रपंचाविषयी येथील व्यक्ती, वस्तू आणि विषय यांच्या संदर्भातल्या अशा आकांक्षा भरभरून असतात, आणि आपण देवाजवळ सतत आपल्या मागण्यांची यादी पुढे करत असतो. इतकेच नव्हे तर या मागण्या भगवंताने आपल्या प्रत्येक वेळेस, आणि आपण म्हणू त्या क्षणी पूर्ण कराव्यात या करिताच केवळ आपण भगवंताची आराधना करीत असतो. बऱ्याच वेळा अशा भक्तांना (?) आपली मागणी पूर्ण करणारा तो आहे, म्हणून भगवंताची गरज आहे.एरवी भगवंतावर प्रेम आहे म्हणून त्यांची भक्ती करणारे असे किती भक्त सापडतील?

आपल्या ''विषयी'' मागण्या मागणारे आपण खऱ्या अर्थाने भक्त नसतोच.

मध्वाचार्य नावाचे एक महान संत होऊन गेले. ते तरुण असताना त्यांनाआपण राजा व्हावे अशी मनात इच्छा झाली. आपल्याला राजे पद मिळावे म्हणून त्यांनी गायत्री मंत्राची उपासना करण्यास सुरुवात केली. गायत्री मंत्राचे २४ लाखाचे एक याप्रमाणे त्यांनी अनेक पुरश्चचरणे केली. पण त्यांना जगदंबा प्रसन्न झाली नाही.

एवढे करूनही जगदंबा आपणास दर्शन देत नाही म्हणून त्यांनी कंटाळून भुताची उपासना करण्यास सुरुवात केली.

स्मशानात भुताचा जप करण्यास त्यांनी सुरुवात केली. आणि अगदी थोड्याच काळात त्यांच्यावर भूत प्रसन्न झाले.

त्यांच्यापासून दूर उभे राहून भुताने त्यांना दर्शन दिले. जेव्हा त्यांनी भूतास विचारले की ''तुम्ही दूर का उभे आहात? माझ्याजवळ का येत नाहीत?'' तेव्हा ते भूत म्हणाले तुमच्या गायत्रीच्या जपामुळे तुमच्यात प्रचंड तेज निर्माण झालेले आहे. या तेजाच्या समीप येण्याची माझी क्षमता नाही. तेव्हा मी इथूनच तुम्हास बोलेन. **(क्रमशः)**

# ॥ निरूपण ॥



ह.भ.प. चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

ज्योतिर्मय साहित्य

**जगदम्ब नमस्तुभ्यं ज्योतिरूपाय ते नमः।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं सुरारिष्टविनाशिनि ।। ५ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. तुझ्या ज्योतीरूपालानमस्कार असो. देवांच्या अरीष्टांचा नाश करणारे, जगदंबे तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं श्रीचक्राङ्किकतमातृके।**
**पतितानां च दीनानामाधारमूर्तये नमः ।। ६ ।।**

जगदंबिके, श्रीचक्रावर अधिष्ठित मातृके, तुला नमस्कार असो. पतितांची दीनांची आधारमूर्ती अशा तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं नित्यं नित्यं नमो नमः।**
**त्वमेव केवलं सत्या कृत्याऽसि त्वं नमो नमः ।। ७ ।।**

जगदंबिके, तुला नमस्कार असो. नित्य नित्य नमस्कार असो. तूच केवळ सत्य आहेस. तू कृत्या आहेस. तुला नमस्कार असो.

**जगदम्ब नमस्तुभ्यं सुरवराभिवन्दिते।**
**दुष्टदैत्यविनाशिन्यै नमस्तुभ्यं नमो नमः ।। ८ ।।**

सुरवरांनी वन्दिलेल्या जगदंबिके, तुला नमस्कार असो. दुष्टदैत्यांचाविनाश करणारे तुला त्रिवार नमस्कार असो.




# डिप्रेशन दूर करण्यासाठी उपाय

ज्योतिर्मय साहित्य

१) डिप्रेशन म्हणजे वेड नव्हे. याबद्दल संकोच, कमीपणा बाळगू नये. आपल्याला डिप्रेशन (नैराश्य) आले आहे, हे स्वतः मान्य करणे महत्वाचे आहे. त्यानंतरच उपायांचा विचार करता येईल.

२) डिप्रेशनमध्ये कुटुंबाचा व मित्रमंडळींचा मानसिक आधार खूप मोलाचा आहे. त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावे.

३) डिप्रेशन पासून दूर राहण्यासाठी स्वत:ला सतत गुंतवून घ्यावे. स्वत:ला आवडणारे काम करावीत. काहीच करायला नको वाटत असेल तरीही काहीतरी करावे.

४) सकारात्मक विचार करावा. नकारात्मक विचारांपासून जाणीवपूर्वक दूर रहावे. चॅनेल वरील नकारात्मक बातम्या पाहू नयेत.

५) आहारात बदाम, जवस, ग्रीन-टी, नारळ, टमाटर, पालक यांचा समावेश करावा. अश्वगंधा पाक दुधासोबत घ्यावा. दूधामध्ये दोन चमचे मध मिसळून दिवसातून दोन वेळा घ्यावे.

६) डी-विटामिनयुक्त पदार्थ खावेत. याचा सॅंशे मिळतो, त्याचा वापर आठवड्यातून एकदा, असा चार आठवडे करावा. ब्राह्मी, हिंग, शंखपुष्पी यांचे समसमान चूर्ण करून रोज घ्यावे.

७) चमेलीची फुले नैराश्य कमी करतात. या फुलांचा गंध मेंदू मधील उष्णता कमी करतो. हा प्रयोग करून पहावा.

८) रोज किमान अर्धा तास मेडीटेशन करावे. यामुळे मन शांत होते, अस्वस्थता कमी होते. ओंकार, प्राणायाम करावा. यामुळे डिप्रेशनची लक्षणे कमी होतात.

९) रोज पंधरा ते वीस मिनिटे ज्ञान मुद्रा करावी. दोन्ही हात गुडघ्यावर ठेवून, अंगठा आणि तर्जनीची टोके एकमेकाला लावावी, इतर तीन बोटे सरळ ठेवावी. या मुद्रेमुळे मन शांत होते, डिप्रेशन कमी होण्यास मदत होते.

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

१०) मोकळ्या हवेत फिरायला जावे. प्रकृती व वयानुसार हलका व्यायाम करावा. दीर्घश्वसन करावे. एरोबिक्स करावे. याचा रक्ताभिसरण प्रक्रियेवर चांगला परिणाम होतो. छातीवर येणारे दडपण, धडधड कमी होते. एनडोर्फीन सारखी मन आनंदी ठेवणारी केमिकल शरीरात स्त्रवतात.

११) लांब फिरायला, ट्रीपला जावे, विनोदी सिनेमे पहावेत. गाणी, संगीत ऐकावे. लहान मुलांशी खेळावे. घरी पाळीव प्राणी असेल तर त्यांच्याशी खेळावे. एकटे बसावे असे वाटले तरी एकटे बसू नये. मित्रांबरोबर वेळ घालवावा.

१२) निसर्गाशी एकरूप होण्याचा प्रयत्न वेगवेगळ्या छंदात वेळ घालवावा जसे कि, आकाशातील रंग पहावे. बागेत काम करावे, जे आवडेल ते करावे. विशेषतः पूर्वी आवडत असणाऱ्या गोष्टी अगदी ठरवून कराव्यात. यामुळे ते मजेदार दिवस पुन्हा येऊ शकतात.

१३) समुपदेशक, कौन्सिलर यांचा सल्ला घ्यावा. त्याप्रमाणे वागण्यात बदल करावा.

**

# ॥ श्री राम कथा ॥




वक्ते : आदरणीय श्री चैतन्य महाराज देगलूरकर

ज्योतिर्मय साहित्य

दशरथाने असा विचार केला की, आपला केस पांढरा झाला, आता आपण परमार्थासाठी पुढील आयुष्य वेचावे.आपण आजवर खुप पुरुषार्थ केला. आजवर देवांनी सुद्धाआपल्या कडून मदत मागितली. आपली प्रजा ही सुखी आहे.आपणास संतती नव्हती तीही झाली.संतांच्या कृपेने संतती झाली.रामा सारखा पुत्र पदरी आला.सुना छान मिळाल्या आणखी काय हवे?


कथा ऐकता ऐकता धावते संकलन
मधुकर बोरीकर, 9403061886

माणसाच्या सांसारिक सुखाचा विचार करताना ६ सुखाचा विचार असतो

अर्थार्जन,प्रेम करणारी पत्नी, गोड बोलणारी पत्नी मिळणे,आज्ञेत राहणारी मुले व जीवन व्यतीत करणारी विद्या मिळणे हि सुखची व्याख्या आहे.आपले पुत्र पराक्रमी आहेत.

राम लक्ष्मण यांनी त्राटिका सुबाहू सारखी बलाढ्य राक्षस मारले. प्रजाही रामावर प्रेम करते आता घ्यावे. सुखाने प्रभू नाम घ्यावे.त्याने मंत्रांन्ची बैठक बोलाविली.आपल्या मनीचा हेतू सांगितला.सर्व मंत्र्यांनी रामाच्या नावास अनुकूलता दाखविली. त्यांनी रामाचे ७२ गुण त्याचे जवळ आहेत हे सांगितले.


विनय व शांतीला खरी संपत्ती असे तुकोबा म्हणतात. रामाजवळ एक विद्यार्थि म्हणुन,पुत्र म्हणून,युवराज म्हणून त्याचे जवळ उत्तम गुण आहेत. दशरथ गंमत म्हणून असे म्हणाले की ,तुम्ही मला कंटाळला आहात काय? ते म्हणाले नाही हो, पण खरेच राम तुमच्या पेक्षा उत्तम राज्य कारभार पाहील.दशरथाला बरे वाटले.सर्वांनी रामाचे नाव पुढे केले.दशरथ म्हणे केंव्हा करावा राज्या भिषेक तर शुभश्य शिघ्रम. अशुभश्य काल हरणम्. **(क्रमशः)**




# आर्थिक उदारीकरणाचे जनक : पी व्ही नरसिंहराव

ज्योतिर्मय 📖 साहित्य

भारताचे माजी पंतप्रधान, नवीन आर्थिक धोरणांची सुरवात करणारे, विद्वान व्यक्तिमत्व पी व्ही नरसिंहराव यांची आज १०४ वि जयंती. आजच्याच दिवशी म्हणजे २८ जून १९२१ रोजी आंध्रप्रदेशातील करीमनगर जिल्ह्यातील वंगारा या गावात त्यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण उस्मानिया विद्यापीठ, मुंबई विद्यापीठ आणि नागपूर विद्यापीठ येथे झाले. मातृभाषा तेलगूबरोबरच हिंदी, इंग्रजी, मराठी, कन्नड यासारख्या दहा भाषांसह सहा विदेशी भाषा देखील त्यांना अवगत होत्या. त्यांनी भारताच्या स्वातंत्र्य संग्रामात आणि हैदराबाद मुक्ती संग्रामात भाग घेतला. १९३५ साली हैदराबादच्या निजामाने विद्यापीठात वंदे मातरम हे गीत गण्यास बंदी घालून निजामाचे गौरव करणारे गीत गाण्याचा आदेश दिला होता तेंव्हा विद्यार्थी दशेतील नरसिंहराव यांनी त्याला कडाडून विरोध केला होता. १९६२ साली ते पहिल्यांदा केंद्रीय मंत्रिमंडळात मंत्री बनले. १९७१ सालापर्यंत ते केंद्रात मंत्री होते. या दरम्यान त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्वाची खाती सांभाळली. १९७१ ते १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यांच्या मुख्यमंत्री पदाच्या काळात भूमी सुधारणा लागू करणारे आंध्रप्रदेश हे भारतातले पहिले राज्य बनले. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे अनेक दिग्गज नेते पराभूत झाले पण नरसिंहराव विजयी झाले. १९८४ व १९८९ ची लोकसभा निवडणूक त्यांनी महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लढवली व जिंकली. १९९१ साली राजीव गांधी यांच्या हत्येनंतर ते काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष बनले. लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यावर त्यांची पंतप्रधान म्हणून सर्वानुमते निवड करण्यात आली. पंतप्रधान बनल्यावर देशाची विस्कटलेली आर्थिक घडी सांभाळण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर होते. त्यांनी मनमोहन सिंग यांची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. मनमोहन सिंग हे निष्णात अर्थतज्ज्ञ होते. नरसिंहराव, मनमोहन सिंग जोडीने आधीच्या सरकारचे सर्व निर्णय बाजूला






श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५


ठेवून आर्थिक उदारीकरणाचा मार्ग स्वीकारला. ज्यावेळी अतिशय गंभीर आर्थिक संकटातून देश सावरला त्यावेळी नरसिंहराव यांना फादर ऑफ इंडियन इकॉनॉमिक रिफॉर्म्स असे म्हटले जाऊ लागले. यासाठी १९९४ साली मनमोहन सिंग यांना युरो मनीने सर्वोत्तम अर्थमंत्र्यांच्या पुरस्काराने गौरविण्यात आले तेंव्हा त्यांनी आपल्या भाषणात सांगितले की याचे खरे श्रेय नरसिंहराव यांना दिले गेले पाहिजे. नरसिंहराव सरकारने १९९२ सालच्या अर्थसंकल्पात परकीय गुंतवणुकीला पोषक धोरण आणले त्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण निर्माण झाले. मोठ्या प्रमाणावर तोट्यात असलेल्या सरकारी संस्थांचे पुनर्जीवन करण्यासाठी खाजगीकरणाची सुरवात नरसिंहराव यांनी केली तर सेबी अर्थात सिक्युरिटी एक्सचेंज बोर्ड आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंजची सुरवात देखील त्यांनीच केली. देशाच्या विकासाला गती देण्यासाठी त्यांनी खासदार निधीची सुरवात केली. सत्तेवर आल्यावर त्यांनी पंजाबमध्ये निवडणुका घेतल्या या निवडणुकीनंतर बियांत सिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. त्या सरकारने दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता प्रस्थापित केली. पंजाबमधील दहशतवादाचे उच्चाटन करण्यामध्ये आणि फुटीरतावादी चळवळीला क्षीण करण्यामध्ये नरसिंहराव यांनी त्यांच्या खंबीर निर्धाराचे दर्शन घडवले. नरसिंहराव म्हणायचे जग बदलले आहे, देशात देखील बदल झाले पाहिजेत. आपल्या याच सिद्धांताला सोबत घेऊन भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवा आकार देत त्यांनी आग्नेय आशिआई देशांसोबत मैत्रीचा प्रारंभ लूक ईस्ट या धोरणाने केला. सत्तेवर असताना त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाल्याने १९९८ सालच्या निवडणुकीत काँग्रेसने त्यांना उमेदवारी नाकारली त्यामुळे त्यांनी राजकारण संन्यास घेतला. त्यांच्यावरील भ्रष्टाचाराचे आरोप न्यायालयात सिद्ध होऊ शकले नाहीत. २३ डिसेंबर २००४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!


# ऋतूंच्या लावण्यमहोत्सवाची चित्रे रेखाटणारे ललितनिबंध - ऋतुचक्र


ज्योतिर्मय 📖 साहित्य


दिवस किती मोठे या दिवसातले आसमंतातल्या कुठल्याही देखाव्याचे निरीक्षण पोटभर करता येते. तास संथपणाने चालत असतात. उगीच नाहीं या महिन्याला ज्येष्ठ म्हटलेले! मोठ्यातला गंभीरपणा, संथपणा, भावगंभीरता या महिन्यात काठोकाठ भरलेली आहे.

ऊन नसल्यामुळे छाया नाही. प्रकाश पण नाही. एका काचेरी आवरणाखाली सारे वस्तुजात आले आहे. छायाप्रकाशाचा खेळ भारतासारख्या उष्ण देशात नेहमीच लोभनीय असतो. पण छायाप्रकाश एक झालेले हे कुंद वातावरणही निराळ्याच शोभेने नटलेले असते, ते मोरांना उन्मत्त करते. समुद्रांना उचंबळून सोडते. या मंद प्रकाशात ऊन नसल्यामुळे झाडे जी उन्हात एकदम काळसर हिरवी किंवा पोपटी पालवी असताना सोनेरी दिसत, तशी दिसत नाहीत.

छाया आणि प्रकाश या दोघांनाही आपल्या पोटात साठवणारे हे जग पहाटेची लालीसुद्धा कशी रोखून धरतात. कुठेच स्वैरपण नाही. ढगांवर करडी, गुलाबी, पिवळी छटा दिसते म्हणून सूर्योदय झाला असे समजायचे, उन, पाऊन, वारा सारे काही या मेघमंडळाने बंदिस्त करून ठेवले आहे. वाराही रोखला आहे. झाडाचे पान आणि पान याच्याच हुकुमाने हलणार. मुसळधार पाऊस कोसळेल, पृथ्वीची निर्मिती पूर्ण होईल, काळे ढग म्हणजे शेतकऱ्याचा आनंद पांढरे ढंग फसवे म्हणतात. पण ज्येष्ठाचे नाव सार्थ करणाऱ्या शुभ्र मेघनाले, मला तू फार आवडतेस. तुझे अवलोकन करताना मला कधी कंटाळा आलेला नाही.






विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२


# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

ज्योतिर्मय 📖 साहित्य

## नृत्यकलेचे पुनरुज्जीवन

रवींद्रनाथांनी अनेक देशांना भेटी दिल्या त्यावेळी तेथील नृत्यप्रकारांचा सुद्धा त्यांनी बारकाईने अभ्यास आणि निरीक्षण केले. १९२७ मध्ये इंडोनेशियातील बाली बेटावर आपल्या सहकाऱ्यांसह ते साडेतीन महिने राहिले. या कालावधीत बालीमधील कला आणि संस्कृतीचा अभ्यास त्यांनी केला. तेथील लोकांकडून सादर केली जाणारी नृत्यकला त्यांना विशेष आवडली. तेथील लोकांच्या नृत्यात एक प्रकारची सहजता असून नृत्य हा त्यांच्या जीवनाचा एक भाग झाला होता असे म्हणता येईल तेथून त्यांनी आपला मुलगा रथींद्रनाथ याला एक पत्र लिहिले त्यात ते म्हणतात...

'' ह्या देशातील उत्सवातील नृत्य हे प्रमुख अंग आहे. येथील नारळीची बाग समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांनी जशी डुलते, तसा येथील स्त्री पुरुष समुदाय नृत्याचा वारा वाहू लागला की डोलू लागतो. नारळीप्रमाणेच त्यांची शरीरे आंदोलित होतात. एक एक समाज एका विशिष्ट मार्गाने आत्मप्रकटन करत असतो. वंग देशाचे हृदय जेव्हा आंदोलित होऊन उठले, तेव्हा सारा भावनावेग त्याने कीर्तन-भजनाद्वारा प्रकट केला. हा भाव प्रकटनाचा विशिष्ट मार्ग अद्यापही लुप्त झालेला नाही. येथील (बलिद्वीपातील )लोकांचे हृदय जेव्हा भावावेगाने भरून जाते, तेव्हा ते शब्दांद्वारे बोलत नाही, नृत्यांद्वारे बोलते. स्त्री सुद्धा नाचते, पुरुषही नाचतो. इकडचा अभिनय मी पाहिला आहे. त्यात प्रारंभापासून अखेरपर्यंत इकडून तिकडे फिरणे असो, भांडण तंटा असो की युद्ध असो, थट्टा मस्करी असो की प्रेम प्रकटन असो, लोभ असो किंवा क्रोध असो या साऱ्यांचे प्रकटन नृत्यात व्हायचे. कथेतील सारे प्रसंग नृत्यातून प्रदर्शिले जायचे. वाणी अगदी स्तब्ध, शरीर पूर्णपणे बोलके. नृत्याची भाषा कळल्याशिवाय कथानक कळायचे नाही.''

याच पत्रात पुढे ते गियानाच्या राजवाड्यात पाहिलेल्या एका नृत्याचे वर्णन करतात. ते म्हणतात,'' सुंदर साजशृंगार केलेल्या दोन छोट्या मुली मुकुटावरील फुलांचे झेले झुलवत झुलवत अन त्यांच्याच छंदात देह डुलवत डुलवत गामोलान ह्या वाद्यवृंदाच्या तालावर नाचत होत्या. आपल्या देशात जलतरंग हा पोरांचा खेळ समजला जातो. पण त्याच पद्धतीने विविध वाद्यांचे तरंग मिश्रित करून किती अपूर्व वाद्यसंगीत निर्माण होऊ शकते हे त्यांचे बहुवाद्यमिश्रित गामोलान ऐकल्यावरच कळते. गामोलानमध्ये मृदुंग, टाळ, छोट्या मोठ्या घंटा यांचा प्रामुख्याने समावेश असतो. पण आपल्याकडील नाट्यगृहातील कन्सर्ट किंवा युरोपीय विविध वाद्यांची हार्मनी ते मात्र हे वादन नव्हे. हे अगदी वेगळे आहे. भारी गोड लागते कानाला. युरोपीय लोकांना सुद्धा ते मानवते. बलिद्वीपीय लोकांचे नृत्य झिमझिम पडणाऱ्या पावसासारखे नाही. ते आहे निर्झराच्या तरंगित प्रवाहाप्रमाणे. त्यांच्या ग्रंथात गान भरले नाही, ते भरले आहे त्यांच्या नृत्यात.''

विविध देशातील संस्कृतींचा आणि नृत्याचा रवींद्रनाथांनी अभ्यास जरी केला असला, तरी त्यांनी त्या सर्व पद्धती किंवा कलाप्रकार जसेच्या तसे उचलले नाहीत. तर आपल्याला हवे तेवढेच त्यातील घेऊन आपले कलाप्रकार आणखी समृद्ध केले. शांतिनिकेतन मधील कला आणि संगीत शिक्षणाला नृत्याची जोड देण्यात आली. तेथील मुले नृत्यनाटिकांमध्ये सहभागी होत असत. स्वतः रवींद्रनाथ त्यांना नृत्याचे धडे देत असत. संगीत आणि नृत्य हे आत्मप्रकटीकरणाचे आणि व्यक्तिमत्व विकासाचे एक अनोखे साधन आहे अशी रवींद्रनाथांची श्रद्धा होती.


प्रसिद्ध भारतीय नर्तक उदयशंकर यांनी एकदा शांतिनिकेतनला आपल्या सहकाऱ्यांसह भेट देऊन विविध नृत्यप्रकार सादर केले. ते प्रकटीकरण पाहून रवींद्रनाथांना अतिशय आनंद झाला. त्याप्रसंगी त्यांचे कौतुक करताना रवींद्रनाथ म्हणाले,'' उच्च व आदर्श नृत्य तेच की जे जनतेत तेज, वीर्य, पौरुषत्व जागे करते. नृत्य हे केवळ रंजनाकरता राबवायचे नाही. तसे ते राबवल्यास त्याला कलावंतिणीच्या किंवा बाईजीच्या नृत्याचे स्वरूप येईल. त्याचा दर्जा ढासळेल. नर्तक हा कवी आणि चित्रकार यांच्याप्रमाणेच स्वतंत्र वृत्तीचा श्रेष्ठ ध्येयवादी असला पाहिजे. व्यापारी वृत्तीपासून व सवंग लोकप्रियतेच्या हावेपासून त्याने दूर राहिले पाहिजे. तरच नृत्यकलेचा दर्जा उंचावेल, कलाक्षेत्रात तिला मानाचे स्थान मिळेल.'' रवींद्रनाथांचे हे विचार आजही नृत्य कलेमध्ये करिअर घडवू इच्छिणाऱ्यांसाठी महत्त्वाचे आहेत.

प्राचीन भारतीय नृत्य कलेला रवींद्र नाथांनी नृत्यकलेतील आधुनिक वैशिष्ट्यांची जोड देत तिचा भारतीय बाज कायम ठेवला आणि भारतीय नृत्यकलेशी सुसंगत ठरेल अशा प्रकारे तिचा विकास घडवून आणला. आधुनिक भारताच्या नृत्यकलेच्या इतिहासात रवींद्रनाथांच्या या कार्याचा गौरवपूर्वक उल्लेख केल्याशिवाय कोणालाही पुढे जाता येणार नाही एवढे महत्त्वाचे योगदान त्यांचे या क्षेत्रातही आहे. **(क्रमशः)**



## इंदापूरी निखारे

### को-रोना...



ज्योतिर्मय 📖 साहित्य

सधन वंशाचे दिवे फुल्ल बुंग होऊन लाँग ड्राईव्ह.... मस्त भारी कार झिंगत झिंगत... त्यांना सगळे माफ असते... आणि खूप कौतुक पण करावे लागते... तर अशाच धुंदीत, प्रचंड वेगाने... जोरदार धडक... दोन आकृत्या उडून रस्त्याच्या कडेला... लहान मुलाच्या रडण्याचा आवाज... क्षणभर कार थांबवून... गाडीतील टेपाचा आवाज मोठा करून...


काही नाहीरे, चल! नवरा बायको मेले... पोरगं वाचलं... रात्रीचे चार साडेचार... भयाण शांतता... आसमंतात रडण्याचा आवाज... साखर झोपेत असणारे... काकड आरती... भजन करत पहाटे हिंडणारे... ऐकू येतच नाही! आला तरी दुर्लक्ष... एक टमरेल घेऊन निघालेला... गावाबाहेर जातांना... रडण्याचा आवाज... टमरेल मधील पाणी... रडून दमलेल्या लेकराच्या घशात... ओळखतो... गावात... रडण्याचा सामूहिक आवाज... मधून मधून, अस्पष्ट आवाज... पांड्यारे, त्याची बायको... आईबापाविना लेकरू... कसं होणार भाग्याच? मामा आहे की... नवजात बालकाच्या रडण्याचा आवाज... आतुरतेने ऐकण्यासाठी उत्सुक असलेल्या...आणि त्या रडण्याचा आनंद... पण तो आनंद... घेता न येणारी... अशी अनेक कुटुंबं... तर अशा कुटुंबातील भाग्या वंशाचा दिवा, कुलदीपक वगैरे नाही तर पोऱ्या...

मामाने सहा सात वर्षाचा होईर्यंत कसे बसे सांभाळले... सोडून दिले चहाच्या टपरीवर भाग्याची लहानपणीची आठवण... ती एव्हडी! तो तेथेच काम करू लागला... तेथेच झोप वगैरे वगैरे... ९/१० वर्षाचा असेल... दमुन शांत झोपलेला... कोणाचा तरी पाठीत फटका... पळ भाग्या पळ... भाग्या दचकून उठला... सर्वांबरोबर धावत सुटला... शहरात येऊन पडला... खिशात थोडेफार पैसे... एका गाडीवर मिसळ पाव... आणि चहाची टपरी... त्याला येत असलेली एकमेव गोष्ट... चहा अन् चहाची टपरी... त्याची अन् टपरी मालकाची नजरानजर... बोलणे... पगार... रहाणार... पगार तुम्ही द्याल तो... रहाणार टपरीवर... खाऊन पिऊन १५००/- सकाळी ६ ते दुपारी २, चालेल... कशालाही सामोरे जाण्याची तयारी... त्यांना काही प्रश्न नसतोच... भाग्या रात्र शाळेत... वेगवेगळी कामे करणारी... अनेक मित्र... भाग्या धावत सुटला... धावता धावता शिकत गेला... वायरमन, प्लम्बिंग, बागकाम बांधकाम, पेंटिंग, ड्रायव्हिंग टू व्हीलर, थ्री व्हीलर, फोर व्हिलर दुरुस्ती... भाग्या मोठा होत गेला... शहर मोठं होत गेलं... १५००/- पगाराचा भाग्या... ६०००/- पगाराचा झाला...आणि बाकीची कामे... पहाता पहाता चारपाच लाख बँकेत... पळ भाग्या पळ... एव्हढाच एक मंत्र! त्या मंत्राचे यश... लग्न... तीन मुलं... बंगला... पैसा... बायकोचं अचानक जाणं... मुलांचं शिक्षण... त्यांची नोकरी, लग्न धावता धावता... भाग्या साठीचा! मुलासूना कडून... त्यांच्या नातेवाईकानी भाग्याची एकसष्टी... भाग्या, आता तू काही नाही करायचे... मस्त फिर... मुलं पण त्याला भाग्याच म्हणायची... आणि भाग्या आता आम्हाला कार पाहिजे... तिघांना आमची बायको, मुलं मोटारसायकल वर त्रास होतो... भाग्या नुसता हसतो... सर्वांकडे रोखून पहातो... अन् स्पष्टपणे नकार देतो... कधीही, कोणत्याही गोष्टीला.. नकार ऐकण्याची सवय नव्हती... अगदी लहानणापासून... मुलं बिथरून जातात... एक किडा वळ वळ वळ वळ वळ... भाग्या बाहेरगावी... अचानक व्हायरस... पूर्ण जगभर भीती... चालत चालत घरी... होम कोरंटाईन शिक्का... स्वतःच्याच बंगल्यात आउट हाऊस मधे... लहानणापासून साथीला असलेले... ती सुंदर सूर्य चंद्रांची किरणे... नजरेत न मावणार आकाश... पण याचा आनंद घेताना एक खंत... मुलं मात्र चौकटी बद्ध... चौकटीतून दिसणारे आकाश... चंद्र सूर्याची किरणे तेव्हढ्याच चौकटीतून... मर्यादित आनंदात रमणारे... चारपाच दिवसांनी... एक कुत्र्यांचं छोट पिल्लू... आउट हाऊस मध्ये रक्ताच्या थारोळ्यात... भाग्या पण मेलेला... डॉक्टर, महापालिका, सरकार, पोलीस, मुलं लांबुनच... अगदी सुरक्षित अंतर... होम कोरोंटाइन... देशभरातील मृत्यूच्या संख्येत एकाने वाढ... फक्त एव्हढीच नोंदणी... मुलांच्या सूनांच्या चेहऱ्यावर प्रचंड दुःख... मुलांच्या सुनांच्या हृदयात प्रचंड आनंद... भाग्याचा प्रवास थांबला होता... नाही थांबविला होता...एका शुल्लक नकाराने... फक्त मुलांना माहीत होते ... रक्त पाहिले की... भाग्याच बी पी आणि शुगर लो होते... आणि ... मुलं सुना... खोट्या खोट्या दुःखात... खोट्या खोट्या आनंदात...







# चला शाळेत जाऊया?

ज्योतिर्मय साहित्य


दि. २३/०६/२०२५ ला शाळा सुरु झाली. परंतु आज दोन दिवस झाले तरी अद्यापही काही विद्यार्थी शाळेत पोहोचले नाहीत. ते का पोहोचले नाहीत, याचं कारण अजुनही कळायला मार्ग नाही. परंतु याबाबत खोलवर विचार केल्यास काही मुलं गावाला गेली असल्याचं कळतं. शाळेचा पहिला दिवस. या दिवशी जास्त मुलं शाळेत येत नाहीत. परंतु जी काही मुलं शाळेत येतात. त्या मुलांना शिक्षक पहिल्याच दिवशी पुस्तक वाटप करतात व शाळेचा गणवेशही देतात. त्याचा गाजावाजा आधीच होतो. कारण उन्हाळभर जी मुलं सुट्टीच्या कालावधीत घरी राहिली. ती सर्वच मुलं शाळेत यावी म्हणून. परंतु तसं होत नाही.

आज शिक्षणाचं महत्त्व वाढलं. नवीन शाळा उदयास आल्या. नवीन शाळा अर्थात कॉन्व्हेंटच्या शाळा. या शाळेनं मराठी शाळा ओस पडल्या नव्हे तर त्या शाळेवर परीणाम झाला. एवढा परिणाम झाला की शाळेचा पहिला दिवस असो की मधातील. मुलांची संख्या कमी असते. तीच संख्या कॉन्व्हेंटच्या शाळेत जास्त असते. याला जबाबदार आहे इंग्रजी शिक्षण. इंग्रजी शिक्षण. या शिक्षणाला आज महत्व प्राप्त झालं आहे. या महत्वातूनच कॉन्व्हेंटमध्ये प्रवेश करण्याचे महत्त्व वाढलेले आहे. या महत्वातूनच आज कॉन्व्हेंटच्या शाळेत भरभरुन मुलं आहेत. तेवढी मुलं आज जि प शाळेत वा मराठी शाळेत दिसत नाहीत. याला कारण आहे इंग्रजी माध्यमाचे महत्त्व. तरीही मराठी माध्यमाच्या शाळेत एक इंग्रजी विषय शिकवला जात आहे.

आता हिंदीलाही महत्व आलेलं आहे. कारण आज भारताची ती गरज आहे. स्पर्धा परीक्षेत महाराष्ट्रातील मुलांना बरोबर हिंदी येय नसल्यानं ती मुलं देशातंर्गत होत असलेल्या स्पर्धेत टिकत नाहीत. म्हणूनच हिंदी पहिल्यावर्गापासून शिकविण्याचा निर्णय. ज्याला आज राजकीय संघटनांकडून विरोध होत आहे. म्हटलं जात आहे की त्याचा विद्यार्थ्यांवर ताण येतोय. परंतु देशातील सर्वच भाषा विद्यार्थ्यांना येणं अनिवार्य आहे. त्यादृष्टीनेच हिंदीचा प्रयोग.

आज इंग्रजीचं प्रस्थ पाहता मराठी शाळेची असलेली ही स्थिती अगदी पहिल्या दिवशीपासूनच आपल्याला पाहायला मिळते. ती म्हणजे शाळेत विद्यार्थी उपस्थिती कमी असणे. तसं पाहता मराठी माध्यमाच्या शाळेची स्थिती चिंताजनक आहे. कारण त्या शाळेत पटावर मुलंच दिसत नाहीत. असतात तिही नाममात्र. तशीच ती पहिली ते चौथीची मुलं एकाच वर्गात बसतात. अशीच स्थिती आढळून येते.

मराठी शाळेची स्थिती अशी चिंताजनक असल्यानं शासनाला मराठी शाळेची चिंता पडली. त्या पुर्ण स पडल्यास गरिबांच्या मुलांना कसं शिकवावं? त्यातच ती जर शिकली नाही तर देशातील साक्षरतेचे प्रमाण कसं वाढवावं? हा प्रश्न मराठी शासनासमोर उभा राहिला. त्यामुळंच की काय, कसंही करुन मराठी शाळेत मुलं वाढावी म्हणून त्यांनी विचार केला व त्या मुलांची संख्या वाढविण्यासाठी शासनानं नवीन धोरण आणलं. ते म्हणजे विद्यार्थ्यांचं पहिल्याच दिवशी शाळेत स्वागत करायचं. शाळेत रांगोळी काढायची. शाळा सजावट करायची. विद्यार्थ्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप द्यायची. त्यांना फुलं द्यायची. पुस्तकं द्यायची. गणवेश द्यायचा. त्यातच त्यांची जास्त पटसंख्या वाढण्याच्या दृष्टीनं प्रयत्न करायचा. यातूनच शाळेच्या पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांचं स्वागत केल्यानं, गणवेश दिल्यानं वा पुस्तके दिल्यानं विद्यार्थ्यांची मराठी शाळेतील पटसंख्या वाढेल असं शासनाला वाटलं. परंतु कितीही केलं तरी पळसाला पानं तीन याप्रमाणेच विद्यार्थी मराठी माध्यमाच्या शाळेत वाढले नाहीत. उलट होती तीच स्थिती आहे.




मराठी माध्यमाच्या शाळेत पटसंख्या वाढो अगर न वाढो. परंतु विद्यार्थ्यांचं स्वागत झाल्यानं विद्यार्थ्यांना अतिशय आनंद झाला आहे. मुठभर का होईना, विद्यार्थी शाळेत येणार आहेत. परंतु ते पुर्णकालीक टिकतील का? ही शंका आहे. कारण ज्यावेळेस ग्रामीण भागात शेतीची कामं सुरु होतात. त्यावेळेस नक्कीच ही मुलं गायब होतात. आज शिक्षणाचं महत्व वाढलं असलं तरी. तसं पाहता सरकारचं ब्रीदच आहे की देशातील सहा ते चौदा वर्षाची सर्व मुलं शाळेत यायला हवीत. ती सातवीपर्यंत टिकायला हवीत व त्यांना दर्जेदार शिक्षण मिळायला हवं. आता कॉन्व्हेंटच्या शिक्षणानं देशात पाऊल ठेवताच शिक्षणाचं महत्त्व वाढलं. त्यामुळंच की काय, आज शिक्षण शिकत असतांना मुल सहा वर्षाचं झालं की तो शाळेत येतो. तसं पाहता शाळेत नापास करण्याची पद्धती नसल्यानं ती मुलं शाळेत चौदा वर्षपर्यंत टिकतातही. परंतु दर्जेदार शिकत नाहीत. दर्जेदार शिक्षण शिक्षक देत असतील तरी. याला जबाबदार आहे आजची आस्था आणि अनास्था. आज कॉन्व्हेंटच्या शिक्षणाबद्दल लोकांच्या मनात आस्था आहे. ती आस्था आज मराठी माध्यमाच्या शाळेतील शिक्षणाबाबत दिसत नाही. ती निर्माण व्हावी म्हणून सरकार प्रयत्नशील आहे. परंतु सरकार कितीही प्रयत्नशील असलं तरी आज तशी मराठी माध्यमाच्या शाळेची पटसंख्या वाढवणं शक्य नाही. कारण आज मराठी माध्यमातून शिकविण्याची पालकांमध्ये मानसिकता उरलेली नाही. त्याचंही कारण आहे. ते म्हणजे देशात मराठीतून होत असलेला वा चालत असलेला व्यवहार वा जगात चाललेला व्यवहार. आज जगात मराठीतून व्यवहार चालत नाही. तसाच हा मराठीतील व्यवहार देशात वा जगातही चालत नाही तर हा व्यवहार इंग्रजीतून चालत आहे.

महत्वपुर्ण गोष्ट ही की आज हा व्यवहार पाहता जरी लोकांची मानसिकता मराठी माध्यमातून आपल्या मुलांना शिकविण्याची नसेल  तरी शासनानं निराश होवू नये. त्यांनी असे काही उपक्रम राबवावेत की लोकं आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमातून शिकवणार. नाही तर त्यांना मराठी माध्यमाच्या शाळेत टाकतील. निव्वळ मोफत गणवेश देवून वा मोफत पुस्तके वाटप करुन मराठी शाळेतील मुलं वाढणार नाहीत. हे तेवढंच खरं आहे.

महत्वपुर्ण गोष्ट सांगायची म्हणजे माझी शासनाला नम्र विनंती राहिल की त्यांनी संबंधीत वस्तू विद्यार्थ्यांना फुकटात देवू नये. मग तो गणवेश वाटप का असेना वा पुस्तक वाटप का असेना, कारण फुकटात मिळणा-या वस्तूंना मोल नसतं. तसंच पालकांनीही कोणत्याही वस्तू आपल्या पाल्यांना शिकवतांना फुकटात मागू नयेत. कारण फुकटात मिळणा-या वस्तू खरं सांगायचं म्हणजे पचवता येत नाहीत. आज तेच होवून राहिले. ज्या कॉन्व्हेंटमध्ये पैसा भरुन शिकवलं जातं. तिथं विद्यार्थ्यांची भरभराट आहे आणि ज्या मराठी शाळेत असा पैसा लावून शिकवलं जात नाही. तिथं मात्र विद्यार्थ्यांची वानवा आहे हेही तेवढंच खरं आहे. म्हणून शिक्षणाला महत्त्व यावं म्हणून शिक्षण निःशुल्क नसावं. आजच्या काळात काही ना काही शिक्षणाला शुल्क असावं. मगच पुस्तके वा गणवेश वाटप करावीत. मग त्या शाळा मराठी माध्यमाच्या का असेना.

***

# टीव्ही मालिकांचे बरे वाईट परिणाम...

ज्योतिर्मय साहित्य

सुरुवातीला ज्यावेळी टीव्ही आला तेंव्हा त्याच्या लागण्याची ठराविक वेळ ठरलेली असे. (त्यामुळे कमीतला आनंद टिकून होता) त्यावेळच्या कितीतरी टीव्ही मालिका इतका काळ लोटला तरी माझ्या मनात आहेत. उदाहरणार्थ. रजनी, स्वामी, कशिश, रामायण, महाभारत याने तर लोकप्रियतेचा उच्चांक गाठला होता. नंतर रिमझिम, अग्निहोत्र, प्रपंच, उंच माझा झोका आभाळमाया, वादळवाट अशा कितीतरी.. आणि माझी अजून एक अत्यंत आवडती मालिका होती ‘‘श्रीयुत गंगाधर टिपरे‘‘ दिलीप प्रभावळकर आणि शुभांगी गोखले (सासरा..सून) यांची अत्यंत सहजतेने केलेली भूमिका, एकत्र हसते खेळते कुटुंब या मुळे ही मालिका प्रचंड लोकप्रिय झाली होती..




काळ बदलला पूर्ण दिवस टीव्ही सुरू झाले. मालिकांचे ठराविक भाग बंद होऊन वाढीव भागामुळे त्यातील संपलेले स्वारस्य, अती भगभगीत दिखाऊपणा, आपल्याच कुटुंबातील जवळच्या नात्याचे शत्रू , बेडगी आयुष्य एकूण अपवादात्मक एखादी मालिका सोडली तरी जिकडे,तिकडे तोच तोचपणा या सगळ्यामुळे रसिक प्रेक्षकवर्ग नक्कीच कमी झाला.. काळाबरोबर बदल थोडा समजू शकतो पण ढीगभर दागिने आणि जड रेशमी साड्यात वैयक्तिक आयुष्यात कोणतीच गृहिणी वावरत नसते त्यामुळे वास्तविकता हरवली.. एकत्र बसून एखादी मालिका बघण्याचा आता आनंदच हरवला आहे..

सध्या मालिका कमी आणि जाहिराती जास्त अशी परिस्थिती असते.. लहान मुले, म्हातारी माणसे यांच्या समोर काळ वेळ न ठरविता वाटेल त्या घाणेरड्या जाहिराती लावतात, व्यसन, जुगार यांची जाहिरात सर्रास प्रतीथयश कलाकार करतात त्यावेळी खूप वाईट वाटते. कुठल्याही वस्तूचे अवास्तव कौतुक बघून सामान्य माणूस त्या भुलभुलैयाला खरे समजून विकत घेतो..ही झाली जाहिरातींची डावी बाजू.. पण काही जाहिराती बघून मात्र मन प्रसन्न होते (लहान मुले आणि आयांच्या) काही मधील सहजता, कधी हसरा चेहरा छान वाटतो..काही जाहिरातीमध्ये खरेच तथ्य असते.मला वैयक्तिक काही जाहिराती नक्की आवडतात.. योग्य माहिती आणि संधी मिळाली असती तर मी ही या क्षेत्रात नक्कीच प्रयत्न केला असता..  शेवटी आपण काय बघायचे आणि काय टाळायचे हे तर आपल्याच हातात असते हो ना?

# ‘महसूल अधिकाऱ्यांची हस्तपुस्तिका’चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रकाशन

ज्योतिर्मय साहित्य

**मुंबई** – ‘महसूल अधिकाऱ्यांची हस्तपुस्तिका’च्या दोन खंडांचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते विधान भवन येथे झाले. ही पुस्तिका राज्य प्रशासनासाठी एक अभूतपूर्व व महत्त्वपूर्ण पाऊल असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या ‘कर्मयोगी भारत’ या उपक्रमाला बळ देणारी आहे, असे सांगून अधिकार्त्यांबरोबरच नागरिकांना देखील ही मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी यावेळी व्यक्त केला.



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी, कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी व इतर महसूल अधिकारी यांना विविध कामे करताना सुलभतेसाठी कायदे व नियम यासंदर्भातील हँडबुक तयार करण्याचा निर्णय महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी घेतला होता. त्यानुसार महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेशकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्यासह जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, जळगावचे अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे तसेच कोकण विभागाचे सहायक आयुक्त रविंद्र पवार यांनी या पुस्तकाचे संपादन केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या हस्तपुस्तिकांच्या कामाचे कौतुक केले.

विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी या दोन खंडांमध्ये महसुली कामे (खंड १) आणि बिगर महसुली कामे (खंड २) यांचा समावेश असून एकूण २४ प्रकरणे असल्याची माहिती दिली.

# १ ते ४ जुलैदरम्यान बालगंधर्व रंगमंदिरात छंदश्री पुरस्कार वितरण सोहळा

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे–** स्वर्गवासी कमलाबाई रसिकलाल धारिवाल पुरस्कृत छंदश्री आंतरराष्ट्रीय दिवाळी अंक स्पर्धा पुरस्कार वितरण सोहळा व दिवाळी, ख्रिसमस, रमजान निमित्ताने प्रकाशित होणाऱ्या अंकांच्या प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. १ ते ४ जुलै २०२५ या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ८ या वेळेत आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन मंगळवारी (ता. १ जुलै) सकाळी ११ वाजता बालगंधर्व रंगमंदिराच्या कलादालनात माजी संमेलनाध्यक्ष व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते, धारिवाल इंडस्ट्रीजचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाशशेठ धारिवाल यांच्या हस्ते होणार आहे. पुरस्काराचे यंदा नववे वर्ष असून, पुरस्कार वितरण सोहळा संध्याकाळी ५ वाजता गणेश सभागृह, टिळक रस्ता पुणे येथे प्रसिद्ध अभिनेत्री डॉ. निशिगंधा वाड, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष मिलिंद जोशी, ज्येष्ठ लेखिका सिसिलिया कार्व्हालो, संमेलनाचे माजी अध्यक्ष भारत सासणे यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती दिनमार्क पब्लिकेशनचे दिनकर शिलेदार यांनी दिली. प्रसंगी साहित्यिक माधव राजगुरू उपस्थित होते.

दिनकर शिलेदार म्हणाले, ही स्पर्धा दिवाळी अंकांसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर घेण्यात येते. यंदा स्पर्धेत ख्रिसमस सणाच्या निमित्ताने वसई येथून प्रकाशित होत असलेल्या अंकांच्या प्रवेशिका, तसेच रमजान सणानिमित्त प्रकाशित होणार नब्ज हा अंक स्पर्धेसाठी स्वीकारण्यात आला आहे. देशभरातून प्रकाशित होणाऱ्या दिवाळी अंकांची माहिती पुणेकरांना व्हावी, यासाठी या अंकांचे प्रदर्शन भरविण्यात येत आहे. कादौडी, पाशिहार हे अंक ख्रिसमसमध्ये कादौडी भाषेत प्रसिद्ध होतात. स्पॅनिश लोक भारतात ५०० वर्षांपूर्वी आले होते; तेव्हा कादौडी भाषेचा जन्म झाला. कादौडी भाषा काही लोकांची बोली भाषा म्हणून प्रचलित झाली. गीत, संक्रमण अशासारखे अंक मराठी भाषेतच प्रसिद्ध होतात. त्यामुळे त्यांना या स्पर्धेत सामावून घेण्यात आले. पुढील वर्षी पश्चिम बंगालमधून बंगाली भाषेतील दुर्गा पूजेनिमित्त प्रसिद्ध होणारे अंक सामील करून घेतले जाण्याचा मानस आहे. यंदा स्पर्धेमध्ये २३४ प्रवेशिका स्वीकारण्यात आल्या आहेत. अमेरिकेतून दोन दिवाळी अंक स्पर्धेत सहभागी झाले आहेत. अशा प्रकारची स्पर्धा आणि प्रदर्शन भारतात प्रथमच सादर करण्याचा मान दिनमार्क पब्लिकेशन्सला मिळणार आहे. काही अंक पूनम एजन्सीच्या श्रीकांत भुतडा यांच्या सहकार्यातून मिळवणार असून, ३०० पेक्षा जास्त अंक प्रदर्शनात असतील, असा विश्वास आहे.

पुण्यातून मिनाज लाटकर या गेली तीन वर्षे रमजाननिमित्त नब्ज नावाचा अंक मराठी भाषेत देवनागरी लिपीत सादर करीत आहेत. कोणत्याही सणानिमित्त प्रसिद्ध होणारे अंक वाचन संस्कृतीचा आधारस्तंभ ठरतात. विविध प्रकारची माहिती त्यामुळे उपलब्ध होते. यामुळेच अंकांचे प्रदर्शन भरवण्याचा घाट घालण्यात आला आहे. इथे धर्माचा विचार बाजूला ठेवला आहे. फक्त वाचन संस्कृतीवर भर देण्यात येतो.

# सुमेधा चिथडे यांना सावित्री पुरस्कार

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे–** विना कष्टाचे आणि फुकट, ते सर्व निर्धारपूर्वक नाकारा. आपल्या कुठल्याही कृतीतून राष्ट्राचे नुकसान तर होत नाही ना, हा विचार प्रथम मनात आणा. पाठ्यपुस्तकाबाहेर डोकवा. समाजात, सभोवताली काय घडत आहे, याची नोंद घ्या. देशसेवा हा प्राधान्यक्रम ठेवा, असा सल्ला सियाचिन आणि कूपवाडा येथे लष्करासाठी ऑक्सिजन जनरेशन प्लांट आणि रिफिलिंग युनिट उभारणाऱ्या व सैनिकांच्या कल्याणासाठी झटणाऱ्या सुमेधा चिथडे यांनी विद्यार्थिनींना दिला.



सावित्री फोरम आयोजित ‘विद्यानिधी’ उपक्रम आणि ‘सावित्री पुरस्कार’ प्रदान सोहळ्यात त्या बोलत होत्या. याप्रसंगी सावित्री फोरमतर्फे दरवर्षी दिला जाणारा ‘सावित्री’ पुरस्कार सुमेधा चिथडे यांना राष्ट्रीय सर्वोत्तम शिक्षक पुरस्काराचे मानकरी, श्री विद्या विकास सेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि नामवंत शैक्षणिक सल्लागार श्रीकांत सुतार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल व श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप आहे. त्याचप्रमाणे ‘विद्यानिधी’ उपक्रमांतर्गत पुण्यातील व आसपासच्या ग्रामीण भागांतील इयत्ता आठवी ते दहावीच्या हुशार पण गरजू अशा ८० विद्यार्थिनींना दीड लाखाच्या शैक्षणिक मदतनिधीचे वाटप करण्यात आले.

सुमेधा चिथडे म्हणाल्या,पुरस्कार ज्या नावाने मिळतो, त्याचे मोल अधिक आहे. हा सावित्रीबाईंच्या नावाचा पुरस्कार आहे. आजच्या सर्व विद्यार्थिनींनी स्वतःमधील सावित्रीबाईंचा शोध घ्यायला हवा. स्वतःवरील विश्वास, परिश्रमांची तयारी, सातत्य, ध्येयाचा ध्यास आणि त्यासाठी आवश्यक ते कौशल्य प्राप्त करण्याची तयारी, यांच्या आधारे तुम्ही जीवनात यशस्वी व्हा. आयते, फुकटचे सर्व नाकारा. कष्टाने मिळवलेल्या गोष्टींनाच मोल असते, हे लक्षात ठेवा. पारंपरिक विद्याशाखांप्रमाणेच लष्करी क्षेत्रातही अनेक संधी आहेत. त्या मिळवा. स्वतःला सिद्ध करून दाखवा. इतरांशी तुलना करू नका, स्पर्धा स्वतःशीच करा. मन. बुद्धी आणि शरीर, यांच्यात एकवाक्यता असू द्या. आपले सैनिक सर्व प्रकारच्या प्रतिकूलतांवर मात करत आपले संरक्षण करतात, याचे भान ठेवा. तक्रार, कारणे आणि अपेक्षांपासून दूर राहा, तुम्ही नक्कीच यशस्वी व्हाल.

सुतार म्हणाले, सुमेधाताईंचे कार्य हे देशसेवा आणि मानवसेवेचे आदर्श आणि उत्कृष्ट उदाहरण आहे. सावित्री फोरमच्या सर्व भगिनी सावित्रीबाईंच्या नावाचा वारसा आणि वसा जपत आहेत, हेही कौतुकास्पद आहे. विद्यार्थी ही राष्ट्राची संपत्ती असते. त्यामुळे स्वतःला ओळखा, विविध स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी व्हा. कर्तृत्व सिद्ध करून राष्ट्रसेवेचा भाग व्हा.

# सहकार पुरस्कार वितरणासाठी कालबद्ध कार्यक्रम जाहीर १८ जुलै पूर्वी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

ज्योतिर्मय साहित्य

**पुणे** – राज्याच्या सहकार चळवळीच्या विकासात उत्कृष्ट योगदान देणाऱ्या सहकारी संस्थांना राज्य शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असून सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यासाठीचा कालबद्ध कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. सहकारी संस्थांनी १८ जुलै २०२५ पर्यंत संबंधित तालुका सहायक निबंधक, उपनिबंधक कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन सहकार आयुक्त दिपक तावरे यांनी केले आहे.

या पुरस्कारांतर्गत ‘सहकार महर्षी’ पुरस्कार-१ , ‘सहकार भूषण’- २१ तसेच ‘सहकार निष्ठ’- २३ असे एकूण ४५ संस्थांना पुरस्कार देण्यात येणार असून अनुक्रमे रुपये १ लाख, रुपये ५१ हजार व २५ हजार रुपये, स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र असे पुरस्काराचे स्वरुप असणार आहे.

पात्र संस्थांच्या निवडीसाठी संस्थाप्रकारनिहाय नोंदणी, वार्षिक सर्वसाधारण सभा, संचालक मंडळ सभा, नफा-तोटा, थकबाकी, संस्थेवरील कायदेशीर कारवाई, लेखापरीक्षण, व दोषदुरुस्ती अहवाल, निवडणूक,व्यवस्थापन, निधीची गुंतवणूक, प्रशिक्षण, सादर करावयाची प्रतिज्ञापत्रे यासाठी ५० गुण, संस्था प्रकारनिहाय निश्चित केलेल्या विशेष निकषांसाठी ३५ गुण व सहकारी संस्थेसाठी योगदान, जनतेसाठी दिलेले योगदान, सहकार चळवळीच्या विकासासाठी प्रयत्न, सहकारी, सार्वजनिक, धर्मादाय प्रयोजनासाठी केलेली मदतीसाठी २० गुण देण्यात येणार आहेत.

शासन स्तरावरील समितीमार्फत २६ सप्टेंबर २०२५ पर्यंत पुरस्कार प्राप्त संस्थांची अंतिम निवड करण्यात येणार आहे. पुरस्काराविषयी अधिक माहिती सहकार विभागाच्या http://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच सर्व जिल्हा उपनिबंधक, तालुका उपनिबंधक, सहायक निबंधक यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अंतर्गत नोंदणी झालेल्या इच्छुक सहकारी संस्थांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रांसह दाखल करावेत, असे आवाहन सहकार विंभागामार्फत करण्यात आले आहे.

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी,  विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.
या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559